**प्रकल्प प्रवर्तक मे. दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड यांचा मौजे - खांड, तालुका-मावळ, जिल्हा-पुणे, महाराष्ट्र येथील प्रस्तावित भिवपुरी (१,०००.० मेगावॅट) ऑफ-स्ट्रीम ओपन लूप उदंचन जलविद्युत प्रकल्प (पीएसपी) करण्याच्या संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृत्त-**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड यांचा मौजे - खांड, तालुका-मावळ, जिल्हा-पुणे, महाराष्ट्र येथील प्रस्तावित भिवपुरी (१,०००.० मेगावॅट) ऑफ-स्ट्रीम ओपन लूप उदंचन जलविद्युत प्रकल्प (पीएसपी) करण्याच्या संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी शुक्रवार, दिनांक ०५ एप्रिल, २०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता प्रकल्प स्थळ - टाटा कॅम्प, मौजे - खांड, तालुका - मावळ, जिल्हा-पुणे (४१२ १०६), महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आलेली होती.

बैठकीच्या सुरुवातीस प्रकल्प प्रवर्तक यांनी बैठकीच्या मंडपातील सुरक्षाविषयी योजनेबाबत उपस्थितांना सर्व माहिती देताना सर्वांचे स्वागत केले. त्यांनी सांगितली की येथे उपस्थित ग्रामस्थ हे आमचे शंभर वर्षांचे सोबती आहेत. त्यांनी बैठकीच्या मंडपातील सुरक्षाविषयी सूचना सांगताना माहिती दिली की जर काही आपत्कालिन परिस्थिती उद्भवल्यास सर्वांना सुरक्षितस्थळी स्वंयसेवक, मदतनीस नेतील. सुरक्षास्थळ हे वाहनतळाच्या बाजूस असून तेथेही मदतनीस स्वयंसेवक आहेत. मंडपात अग्निरोधक सयंत्रणा उपलब्ध असून अग्निशामक गाडी मंडपाच्या बाहेर आहे. उन्हाळ्याचे दिवस असल्याने उष्माघातासाठी पिण्याचे पाणी व शीतपेये उपलब्ध आहेत. मंडपाच्या शेजारीच पोलिस कक्ष असून वैदकीय सुविधेची सोय आहे. आपत्कालिन परिस्थितीत येथे रुग्णवाहिका व वैदकीय अधिकारी हे उपलब्ध आहेत.

श्री विद्यासागर किल्लेदार, उप प्रादेशिक अधिकारी, पुणे-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी ज्योती कदम, अपर जिल्हादंडाधिकारी, पुणे तथा अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती; श्री प्रशांत गायकवाड, प्रतिनिधी, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती; श्री विक्रम देशमुख, तहसीलदार, तालुका-मावळ, जिल्हा-पुणे; श्री. सुयोग बेंद्रे, नायब तहसीलदार, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे; प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी, पोलिस प्रशासन व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड यांचा त्यांच्या मौजे - खांड, तालुका-मावळ, जिल्हा-पुणे, महाराष्ट्र येथील प्रस्तावित भिवपुरी (१,०००.० मेगावॅट) ऑफ-स्ट्रीम ओपन लूप उदंचन जलविद्युत प्रकल्प प्रकल्प (पीएसपी) करण्याच्या संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी

आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास ईमले अर्ज दिनांक १९-०२-२०२४ रोजी प्राप्त झाला. सहसंचालक, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी पत्र दिनांक २३-०२-२०२४ नुसार उप प्रादेशिक कार्यालय-पुणे-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे यांना पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची प्रक्रिया राबविण्याची सूचना केली.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग ए, सेक्टर १ (सी) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक ०७/०८/२०२३ रोजी सादर केला व त्यास अर्जास ऑनलाईन मंजूरी दिनांक २३-०९-२०२३ रोजी प्रदान केली.

जिल्हाधिकारी, पुणे यांनी प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास शुक्रवार , दिनांक ०५ एप्रिल, २०२४ रोजी दुपारी १२. ०० वाजता मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई- १२६ /२०२४ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२४०३११ एफटीएस -००८८ दिनांक - ११-०३-२०२४ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी,पुणे,<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई<br>यांचे प्रतिनिधी -<br>प्रादेशिक अधिकारी -पुणे,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>पुणे | - | **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी, पुणे-२<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>पुणे | - | **आयोजक** |

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी, पुणे-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक लोकसत्ता

यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत ०५ मार्च, २०२४ रोजी जनसुनावणीबाबत जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती.

त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या अवलोकनार्थ व माहितीकरीता खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते -

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर - ४४० ००१

२) मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे,

३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, पुणे,

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, पुणे,

५) उप विभागीय अधिकारी, मावळ-मुळशी उपविभाग, पुणे तलाठी प्रशिक्षण केंद्र, बावधन, तालुका-मुळशी, जिल्हा-पुणे,

६) उप विभागीय अधिकारी, खेड, तालुका- खेड, जिल्हा- पुणे,

७) तहसीलदार, मावळ, तालुका-मावळ, जिल्हा-पुणे,

८) तहसीलदार, खेड, तालुका-खेड, जिल्हा-पुणे,

९) ग्रामपंचायत कार्यालय- **तालुका - मावळः-**
वडेश्वर, नागाथली, डाहुली, खांड, सावळा, इंगळून, मालेगाव बुद्रुक, शिधें,

१०) ग्रामपंचायत कार्यालय- **तालुका - खेडः-**
अढे, अंभू, वंजूळ विहिरे, वांद्रे, तोरणे खुर्द,

११) संचालक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई § ४०० ०३२.

१२) सदस्य सचिव - मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२

१३) प्रादेशिक कार्यालय, पुणे व उप प्रादेशिक कार्यालय पुणे-२, म.प्र.नि. मंडळ, जोग सेंटर, २ रा व ३ रा मजला, वाकडेवाडी, पुणे-मुंबई रस्ता, पुणे- ४११ ००३.

१४) संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी,पुणे-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे यांना ०४ सूचना/आक्षेप प्राप्त झालेले आहेत.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ती संधी देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही समिती फक्त लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने

मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. आयोजक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश दिले,

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प प्रवर्तक यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पासाठी एकूण खर्च अंदाजे रुपये ४७४३.५९ कोटी असून पर्यावरण व्यवस्थापनासाठी भांडवली खर्च अंदाजे - रुपये २३.७६ कोटी तर आवर्ती खर्च - रुपये ४४.३६ कोटी रुपये ७ वर्षाकरीत आहे. प्रकल्पात बांधकाम टप्प्यात सुमारे १,००० ते १,५०० तात्पुरत्या स्वरुपाच्या व्यक्तींची गरज असून सर्व मनुष्यबळ हे स्थानिक गावातूनच घेतले जाईल.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की प्रस्तावित प्रकल्प हा १,००० मेगावॅट क्षमतेचा भिवपूरी उदंचन जलविद्युत प्रकल्प हा रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात मौजे भिवपुरी कॅम्प येथे नियोजित आहे. सदरहू प्रकल्पात इंद्रायणी नदी खो-यातील मौजे वडेश्वर, तालुका-मावळ, जिल्हा-पुणे येथील विद्यमान ठोकरवाडी धरण जलाशय उर्ध्व जलाशय (Upper Reservoir) म्हणून वापरण्यात येणार असून रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील मौजे-भिवपुरी कॅम्प येते नविन निम्न जलाशया (Lower Reservoir) करिता दगडी-धरण बांधण्यात येणार आहे.

त्यांनी सांगितले की उदंचन जल प्रकल्प म्हणजे येथे एक उर्ध्व/वरच्या बाजूस व निम्न/खालच्या बाजूस जलाशय लागतो. पाणी वाहून नेण्याची यंत्रणा, पॉवर हाऊस, जनरेटर. देशात सौर उर्जा व पवन उर्जा यांचे उत्पन्न घेण्याचे प्रमाण फक्त भारतात नाही, तर जगभर वाढतच चालले आहे. सौर उर्जा ही दिवसाच्या काही काळापर्यंतच मिळते, तर पवन उर्जा ही हंगामी स्वरुपाची म्हणजे बेभरवशाची आहे. तर सौर उर्जा ही तयार झाल्यानंतर साठविली तर ती चोवीस तास आपल्याला पाहिजे तेव्हा वापरता येऊ शकते. तर पर्यावरण स्नेही व स्वस्त साठवण करुन पाहिजे तेव्हा वापरण्यासाठी एक यंत्रणा उपलब्ध आहे, ती म्हणजे उदंचन जल विद्युत प्रकल्प. जेव्हा सौर उर्जा उपलब्ध असते, त्यावेळी ती पंप व मोटरसाठी वापरण्यात येते. खालच्या जलाशयाचे पाणी हे वरच्या जलाशयात टाकले जाते, जवळजवळ ५४० मीटर उंच जलाशयात टाकण्यात येते. जेव्हा सौर उर्जा उपलब्ध नसते व वीजेची मागणी असते, त्यावेळी ते वरच्या जलाशयाचे पाणी त्याच मशिनला टर्बाईन व जनरेटर म्हणून वापरतो, वीज निर्मिती करुन ग्रीडमध्ये पॉवर देण्यात येते व खालच्या जलाशयात पाणी साठविण्यात येते. हा उदंचन जलविद्युत प्रकल्पाचा भाग आहे. भीरा येथे गेले २५ वर्षे उदंचन जलविद्युत प्रकल्प कार्यरत आहे. नकाशात दाखविल्याप्रमाणे प्रकल्पाचा ८०% भाग हा रायगड जिल्ह्यात, २०% भाग हा पुणे जिल्ह्यात येतो.

प्रकल्प बांधकाम टप्प्यात असताना कामगार वसाहत व विविध बांधकाम उपक्रमातून निर्माण होणारे सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येईल. शोषखड्डे, मलनिःस्सारण प्रक्रिया ही करण्यात येईल. प्रकल्प बांधकाम टप्प्यात वाहनांची वाहतुक, ब्लास्टींगमुळे ध्वनि प्रदूषण होऊ शकते. त्याबाबत विविध उपाय करण्यात येतील.

प्रकल्पात उत्पन्न होणा-या ई-कच-याची (E-Waste) विल्हेवाट ही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार करण्यात येईल. येथील पर्यावरणास काहीही हानी पोचणार नाही.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की पर्यावरण व्यवस्थापन योजनेतर्गत विविध घटकांवर खर्च करण्यात येईल. टाटा पॉवर येथे शंभर वर्षापेक्षा जास्त वर्षे कार्यरत आहे. त्यामुळे टाटा समुह व येथील स्थानिक जनता हे एक कुटुंब या नात्याने येथे नांदत आहोत. परिसरात विविध सामाजीक, शैक्षणिक उपक्रम राबवित असतो. क्लब एनर्जी उपक्रमात उर्जेची बचत कशी करायची हे शाळेतील मुलांसाठी राबविण्यात येते. ब-याच शासकीय योजना या समाजातील गरजु व्यक्तींपर्यंत पोहचत नाहीत. तर याबाबत जनजागृती करण्यासाठी जे उपक्रम राबविण्यात येतात उदा - सुकन्या समृध्दी योजना ही केंद्र शासनाची खास मुलीसाठी योजना आहे, ती ब-याच लोकांना माहित नाही, अशा योजना लोकांपर्यत पोहचविण्याचे काम करतो. अनोखा धागा हा उपक्रम राबविण्यात येतो. त्याठिकाणी येथील स्थानिक महिलांनी कोविडच्या काळात सर्वोत्तम काम केलेले आहे. त्यांनी लाखो मास्क तयार करुन ते देशपातळीवर पुरविलेले आहेत. ग्रामीण भागातील शाळांना सर्वात मोठा प्रश्न भेडसावतो, तो म्हणजे वीजेचा पुरवठा. ब-याच वेळा लोड शेडिंग असते, शाळेतही संगणकावरच शिकवत असल्याने वीजेच्या उपलब्धतेशिवाय काहीही चालू शकत नाही. तर ईलर्निग कीट्स पुरवून शाळेतील मुलांची गुणवत्तेत कशी वाढ करता येईल याबाबत आम्ही काम करत आहोत.

**प्रकल्पाचे फायदे -** प्रकल्प बांधकाम टप्प्यात १०००-१५०० तात्पुरत्या स्वरुपाचे लोक विविध कौशल्य असणारे येथे काम करणार आहेत. प्रकल्प प्रवर्तकांचा प्रयत्न आहे की येथील जास्तीतजास्त स्थानिकांना म्हणजे पुणे जिल्ह्यातील मौजे - खांड गाव व रायगड जिल्ह्यातील भिवपूरी गावातील लोकांना रोजगाराची संधि देण्यात येईल. या प्रकल्पामुळे येथील सामाजिक आणि आर्थिक जीवनमान स्तर उंचावेल. हा सर्वात स्वस्त, स्वच्छ उर्जा साठवणुकीचा प्रकल्प आहे. अशा प्रकल्पांची फक्त महाराष्ट्रालाच नाही, तर देशालाही खूपच गरज आहे. हा प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर अशा प्रकारचा देशातील सर्वात मोठा प्रकल्प असेल. त्याचा आपल्या सर्वांनाच अभिमान वाटणार आहे. या प्रकल्पात आपल्या सर्वांचाच सहभाग असणार आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पुढे माहिती दिली की येथील स्थानिकांची मागणी होती की येथे आरोग्य सुविधा योग्यप्रमाणात उपलब्ध नाहीत. शासकीय आरोग्य उपकेंद्रास शासनाने मंजूरी दिलेली होती. मात्र त्यासाठी जमिन उपलब्ध नव्हती. तर प्रकल्प प्रवर्तकांनी म्हणजे टाटा पॉवरने आपली वडेश्वर येथे २० (वीस) गुंठे जमिन शासकीय आरोग्य उपकेंद्रास मंजूर केलेली असुन तेथे लवकरच करारानामा होऊन, बांधकाम पूर्ण झाल्यानंतर सर्वांनाच आरोग्य सुविधा मिळतील.

सादरीकरण पूर्ण झाल्यानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिति यांनी उपस्थितांना सांगितले की प्रकल्प प्रवर्तकांनी प्रकल्प बांधकाम टप्प्यात व पूर्ण झाल्यानंतर प्रदूषण नियंत्रणासाठी योजण्यात येणा-या पर्यावरण व्यवस्थापन योजनांविषयी (ईएमपी) सविस्तर माहिती दिलेली आहे. त्यांनी उपस्थितांना आवाहन केले की प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप असल्यास ते उपस्थित करण्यात यावेत. सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम नांव व राहण्याचे ठिकाण/गाव सांगण्यात यावे. सर्वांच्या सूचना, आक्षेप यांची नोंद करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे ज्यांना लेखी निवेदन सादर करावयाचे आहेत, ते त्यांनी सादर करावेत. त्यास प्रकल्प प्रवर्तकांकडून लेखीस्वरुपात उत्तर देण्याची सूचना करण्यात येत असून ते बैठकीच्या इतिवृतासोबत शासनास सादर करण्यात येईल. तरी एकाएकाने येऊन लेखी निवेदन सादर करावे.

उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-

१) **श्री सागर विठ्ठल नगरकर, राहणार -खांड गाव, तालुका-मावळ, जिल्हा-पुणेः**

सदरहू प्रकल्प येथे कार्यान्वित होणार आहे हे चांगले आहे. पर्यावरणावर काय परिणाम होणार आहे हे सादरीकरणात दर्शविण्यात आलेले आहे. मात्र गावाच्या ज्या काही मागण्या आहेत, त्या लेटरहेडवर लेखी स्वरुपात सादर करण्यात येत आहे. त्याबाबत विचार व पुढील कार्यवाही अपेक्षित आहे. त्यावर कंपनी प्रशासनाने विचार करुन स्थानिकांबरोबर चर्चा करुन तोडगा काढण्यात यावा.

सादरीकरणात सांगण्यात आले की सीएसआर उपक्रम येथे राबविण्यात येतात व गावाला त्याचा फायदा होतो. हे आम्हांला मान्य नाही. सीएसआर उपक्रमांचा फायदा स्थानिक परिसरातील गावांना अपेक्षेपेक्षा खूपच कमी प्रमाणात झालेला आहे. तो जास्त होणे अपेक्षित आहे. रायगड जिल्ह्यातील भीवपुरी येथे जेवढ्या सीएसआर उपक्रम राबविले जातात, त्याच्या १०% उपक्रम येथे राबविले जातात. खांडमध्ये काहीही सीएसआर उपक्रम राबविले जात नाहीत. मी लहानपणापासून येथे राहतो. सीएसआर उपक्रमात बियाणे, कडधान्ये, अभ्यासासाठी वह्या या गोष्टी मिळत.

माझा आक्षेप आहे की खांड गावात काहीही सीएसआर उपक्रम राबविले जात नाहीत. सादरीकरणात सांगण्यात आले की स्थानिक विद्यार्थ्यांना ई-लर्निंग प्लॅटफॉर्मव्दारे प्रशिक्षण देण्यात येते. मात्र टाटा पॉवरसारखी कंपनी असतानासुध्दा खांड गावाला लोड शेडिंग हे सहन करावे लागते. ही खेदजनक बाब आहे. खांड गावाबरोबरच सावळा गाव व आजूबाजूच्या वाड्या येथे पावसाळ्यात खूपच वाईट अवस्था असते. लोडशेडिंग सतत चालते. उन्हाळ्यात दोन-दोन महिने वीज पुरवठा होत नाही. माझे बालपण येथेच गेलेले आहे.

ई-लर्निंगचा विचार केल्यास २१ शतक आले असताना आमच्याकडे अजूनही नेटवर्क नाही. तर येथे ई-लर्निंग कसे चालेल? प्रकल्पाने खूप मोठे एलईडी, एलसीडी, प्रोजेक्टर दिलेले आहेत. त्याचा येथे अगदी अल्पप्रमाणातच उपयोग होतो. लेखी स्वरुपात मागणी केलेली आहे.

- प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की सदरहू प्रकल्पामुळे येथील ७०% स्थानिकांना रोजगार मिळेल. तर ते प्रमाण ९०% करण्यात यावे, ज्यावेळी परिसरातील पदवीधर, इंजिनियर्स ज्यांना नोकरीसाठी बाहेर जावे लागते, ते लागणार नाही. येथील स्थानिकांच्या एकूणएक गरजा पूर्ण करण्यात याव्यात.
- प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर देताना प्रथम त्यांना धन्यवाद दिले व सांगितले की स्थानिक व कंपनीचे स्थानिक व्यवस्थापन यांनी एकत्र बसून समन्वय साधाण्याची सूचना स्वागतार्ह आहे.
- प्रकल्पास वीज पुरवठा करण्याचा परवाना नाही. जरी भीवपुरी विद्युतगृहात वीज निर्मिती करतो, तरी येथे परवाना नसल्याने विद्युत पुरवठा करता येत नाही. आम्हांला याबाबत

वारंवार मागणी करण्यात आलेली असून आम्ही काहीही करु शकत नाही. शाळेतील विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून सौर उर्जेचा उपक्रम त्यासाठी घेण्यात आलेला आहे. जर स्थानिक लोकप्रतिनिधींनी याबाबत शासकीय पातळीवर प्रयत्न केल्यास परवानगी मिळाल्यास स्थानिकांना वीजपुरवठा करण्यास प्रकल्प प्रवर्तकांना आनंद होईल.

- तसेच प्रकल्पात आवश्यक कौशल्यधारित स्थानीक व्यक्तींना रोजगारात जास्तीतजास्त संधी देण्यात येईल. उर्वरित मागण्यांसाठी एकत्र बसून सकारात्मक निर्णय घेण्यात येईल.

**२) श्री अंकूश आंबेकर, राहणार- खांड निळशी गाव, तालुका-मावळ, जिल्हा-पुणेः-**

स्थानिकांना त्यांच्या व्यथा मांडण्याची संधी या व्यासपीठामार्फत दिल्याबद्दल जिल्हा प्रशासनाचे आभार. खांड, सावळा व २८-२९ वाड्यावस्त्या आहेत, येथील स्थानिकांना आनंद होत आहे की प्रकल्पात गावातील तरुण-तरुणींना त्यांच्या कौशल्यानुसार रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी १८८० साली या जागेचे भूसंपादन केले. १९२२-२३ ला हा प्रकल्प पूर्ण झाला. जवळजवळ १४४ वर्षे पूर्ण झालेले आहेत. ७,८०० हेक्टर (एकंरीत १९,५०० एकर) जमिन स्थानिकांनी प्रकल्पासाठी दिलेली आहे. तरी गेले शंभर होऊनही या भागाचा विकास पाहिजे तसा झालेला नाही. स्थानिक ग्रामपंचायतीतर्फे स्थानिक विविध समाजोपयोगी कामांसाठी ठराव मंजूर करुन प्रकल्प प्रवर्तकांना अनेक वेळा देण्यात आलेले आहेत. मात्र प्रकल्प प्रवर्तकांनी त्याबाबत मंजूरी दिलेली नाही. अनेक ठिकाणी स्मशानभूमी नाही. काही गावात स्मशानभूमीला जागा नाही. कंपनीने येथे आरोग्य उपकेंद्रासाठी जागा दिली असे सांगण्यात आले, पण ग्रामस्थांनी प्रकल्पास १९,५०० एकर जागा दिलेली आहे.

येथे नेटवर्क नसते, त्यामुळे स्थानिक विद्यार्थी-विद्यार्थीनीना अतिशय त्रास सहन करावा लागतो. स्थानिक मुलांना येथून ३५ कि.मी, लांब शाळेत जावे लागते. पालकांची परिस्थिती हलाकीची असताना ते शिकण्यासाठी पाठवितात. तसेच नोकरीसाठी तेवढेच अंतर जावे लागते. परिसरातील प्रचंड वाहतुकीमुळे येथील स्थानिक तरुणांना आपले जीव गमवावे लागलेले आहेत.

येथील स्थानिक युवक-युवती प्रामाणिक आहेत, तर त्यांना व्यवसाय मार्गदर्शन, स्थानीक व्यवसायात प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. येथे शेती आहे, पण कंपनी शेतीसाठी पाणी देत नाही, ही स्थानीक शेतक-यांची व्यथा आहे. येथे ३५२.६४ टीएमसी क्षमता जलाशय प्रकल्प अगोदरचा असून सद्यस्थितीत ७५.० मेगावॅट वीज निर्मिती करत असताना प्रकल्प प्रवर्तक नविन प्रकल्प स्थापन करणार आहे. जरी त्या नविन प्रकल्पास आमच्या स्थानिकांची मान्यता असताना स्थानिक ग्रामपंचायतीच्या ठरावाबाबत प्रकल्प प्रवर्तक सकारात्मक निर्णय घेत नाही. तरी स्थानिकांशी समन्वय साधून सकारात्मक निर्णय घेण्यात यावे.

- प्रकल्प प्रवर्तकांनी श्री आंबेकर यांनी प्रकल्पास पाठिंबा आणि सहकार्य दिल्याबद्ल प्रकल्प प्रवर्तकांनी आभार मानले.
- प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कंपनी शेतात पाणी देत नाही हा आक्षेप नोंदविण्यात आलेला आहे. तर दहा वर्षापूर्वी कंपनीने महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागासोबत करार केलेला असून त्या करारानुसार ठोकरवाडी catchment area त जी गावे आहेत, ते

शेतकरी वर्षाला ३.० दशलक्ष घनमीटर पाणी जलसंपदा विभागाच्या परवानगीने शेतीसाठी/सिंचनासाठी वापरु शकतात. आजही कोणत्याही शेतक-याला सिंचनासाठी पाणी हवे असल्यास त्यांनी जलसंपदा विभागास अर्ज करावा. माझ्या माहितीप्रमाणे जलसंपदा विभागाकडे अजूनही शिल्लकी साठा (quota) आहे. पूर्ण ३.० दशलक्ष घनमीटर पाण्याचे वाटप झालेले नाही. जलसंपदा विभागाकडून परवानगी मिळेल. ती परवानगी मिळाल्यानंतर प्रकल्प प्रवर्तक कुठलीही आडकाठी करणार नाही.

- मात्र सदरहू पाण्याचा वापर हा व्यापारी वापरासाठी (Commercial Use) करता येणार नाही. पिण्याच्या पाण्यासाठी, सिंचनासठी प्रकल्प प्रवर्तकांनी कधिही आडकाठी केलेले नाही.

श्री आंबेकर यांनी सांगितले की आम्ही परवानग्या काढलेल्या आहेत. पण येथील विद्युत पुरवठा ही अतिशय खंडित असतो. तर नुसती जलसंपदा विभागाकडून परवानगी काढणे काहीही फायद्याचे नाही. आम्ही सामुदायिक शेतीसाठी परवाना घेतला, पाण्यासाठी परवाना काढला, पण वीज वारंवार खंडीत होत असल्याने पाणी उपसा करता येत नाही. जी जी पीके लावली, ती जळून खाक झाली. तरी आमची मागणी आहे की टाटा कंपनीने येथील स्थानीक शेतक-यांना सामुहिक शेतीबाबत मदत करावी. येथील स्थानिक युवक-युवतींना प्रकल्पात रोजगाराची संधी देण्यात यावी ही विनंती.

- प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की बैठकीत सांगितल्याप्रमाणे वीजपुरवठा करण्याचा परवाना आम्हांला नाही.

त्यावेळी श्री आंबेकर यांनी मागणी केली की आम्ही वीजपुरवठा मागत नाही. तर स्थानिक शेतक-यांना सामुहिक शेतीबाबत जी जी मदत लागेल, ती कंपनीने उपलब्ध करुन देण्यात यावी. आम्हांला वैयक्तिक मदत नको.

- प्रकल्प प्रवर्तकांनी यांनी याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले.

३) **श्री राजेश खांडभोर, राहणार- वडेश्वर गाव, तालुका-मावळ, जिल्हा-पुणेः-**

माझे २-३ प्रश्न आहेत. सदरहू प्रकल्पासाठी एकूण खर्च किती होईल? तसेच सद्यस्थितीत प्रकल्पाचा सीएसआर निधी हा ८०% रायगड जिल्ह्यासाठी व २०% पुणे जिल्ह्यासाठी वापरण्यात येतो. तर नविन प्रकल्पाचा सीएसआर निधी हा येथील ग्रामपंचायत क्षेत्रातील हद्दीत किती वापरणार?

तसेच नविन प्रकल्पात पाणी खाली नेऊन परत वर आणणार आहात. तर आता ७५.० मेगावॅटचा प्रकल्प कार्यरत आहे, तर ते पाणी बंद करणार आहात काय? जर बंद करणार नसाल, तर अतिरिक्त पाण्याचा साठा कोठून आणणार आहात? जवळजवळ पंचवीस वर्षांपूर्वी याच गावात एक प्रकल्प आलेला होता. एल एन्ड टी कंपनीने काम घेतलेले होते. येथे बैठकीत सावळा आणि खांड ग्रामपंचायत हद्दीतील लोक जास्त प्रमाणात आहेत. इतरही ग्रामपंचायत हद्दीतील लोक आलेले आहेत. तर येथे प्रत्येकाल वाटते की प्रकल्पात आपल्या मुलाला काम मिळावे. वडेश्वर ते खांड सावळा आणि किवळे ते सावळा नऊ ग्रामपंचायती येतात. येथे प्रकल्प अधिका-यांनी आश्वासन दिले की या प्रकल्पात फक्त स्थानिक ग्रामपंचायत हद्दीतील युवक-

युवतीं ज्यांच्याकडे आवश्यक कौशल्य आहे, त्यांना प्रकल्पात नोकरीची संधि देण्यात येईल. तसे होत नाही. तर सर्वांच्यावतीने सांगण्यात येते की एक जरी व्यक्ती बाहेरील असेल, तर आम्ही तुमचा प्रकल्प बंद करु.

दुसरी गोष्ट सादरीकरणात दर्शविण्यात आलेले आहे की या परिसरात खूप सुधारणा केल्या. आपण रुग्णवाहिकेची सेवा बंद केलेली आहे.येथे नेटवर्कसुध्दा नसते. आदिवासी क्षेत्रात ग्रामपंचायत असल्याने येथे ग्रामपंचायतीस कर्मचा-यांनाही पगार देण्यास पैसे नाहित. आता जलजीवन योजनेची कामे चालू आहेत. पण लाईट गेले की लोकांना पिण्याचे पाणीसुध्दा मिळत नाही. वीजेचे बील भरण्यास ग्रामपंचायतीकडे पैसे नाहित. सर्व प्रथम ज्या नऊ ग्रामपंचायती आहेत, सौर उर्जा उपक्रमात जर कंपनीने पंप दिला, तर ग्रामपंचायतीस लाईटबील भरावे लागणार नाही. त्यामुळे ग्रामपंचायतीवर आर्थिक बोझा पडणार नाही.

आता शिक्षणाबाबत. कंपनी दहावीच्या मुलांना नवनीत पुस्तकाचे वाटप करते याबाबत धन्यवाद. वडेश्वर गावात "एकच धागा" उपक्रमात काही महिलांना रोजगार देण्यात आलेला आहे, त्याबद्दल आभार. मात्र प्रकल्प प्रशासनाने वेळोवेळी सामाजीक उपक्रम राबविताना स्थानिकांना विश्वासात घेणे अपेक्षित आहे.

आपण सीएसआर निधी स्थानिक परिसरात खर्च केलेला नाही. प्रकल्प प्रशासन असे सांगते की करोना काळात ऑक्सीजनचा पुरवठा देशभर केला. मात्र जेव्हा या परिसरात गरज होती, त्यावेळी ऑक्सीजनचा पुरवठा केलेला नाही. कंपनीने पंचवीस लाख रुपये पाण्याची रॉयल्टी जमा केलेली आहे, त्याचे वाटप आमच्या ग्रामपंचायतीस झालेले नाही. जर कंपनी पाण्याची रॉयल्टी भरत नाही, तरी ती रॉयल्टी तहसीलदारांकडे देण्यात यावी. आम्ही स्थानिक लोकप्रतिनीधींकडून ती ग्रामपंचायतीचे वाटप करु. जर असे करणार असाल, तरच प्रकल्पास मान्यता आहे. करणार नसाल, तर प्रकल्पास मान्यता स्थानिकांकडून मिळणार नाही. प्रथम या आक्षेपांचे उत्तर देण्यात यावे, नंतर पुढील मुद्दे मांडण्यात येतील.

- प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर देताना माहिती दिली की प्रकल्पाचा एकूण खर्च अंदाजे ४,७०० कोटी आहे. हा संपूर्ण प्रकल्पाचा खर्च आहे. त्यामध्ये सुमारे आठ कोटींची तरतुद ही सीएसआरच्या कामांसाठी राखीव आहे. तर त्यातील चार कोटी हे भिवपूरी, रायगड जिल्ह्यासाठी व चार ही मावळ,पुणे जिल्ह्यासाठी असू शकते. आवश्यकतेनुसार ती खर्च करण्यात येईल.
- प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की अतिशय चांगली सूचना करण्यात आलेली आहे की ग्रामपंचायतींचे पंप हे सौर उर्जेवर करणेबाबत. याबाबत प्रकल्पाच्या वरिष्ठ पातळीवरिल व्यवस्थापनाशी चर्चा करण्यात येऊन पुढील निर्णय घेण्यात येईल. स्थानिक पातळीवर जर आमचा संवाद व समन्वय कमी पडला असल्यास तो निश्चितच वाढविण्यात येईल.
- प्रकल्प प्रवर्तकांनी पुढे माहिती दिली की कान्हे फाटा ते कंपनीपर्यंत टाटा पॉवरच्या मालकीचा रोड असतानाही तो राज्य शासनास हस्तांतरित करण्यात आलेला आहे. आता तेथे नविन पूल बांधण्यात येत आहे. तरी भविष्यात निश्चितपणे स्थानीक, जिल्हा प्रशासन, शासन यांच्याशी कंपनी प्रशासन असेच चांगले प्रकल्प राबविण्यासाठी सहकार्य व समन्वय ठेवेल.

- प्रकल्प प्रवर्तक यांनी पुढे सांगितले की बैठकीत युवा प्रशिक्षणाबाबत सूचना करण्यात आलेल्या आहेत. तर लोणावळा येथील आय.टीयआय ला येथील काही स्थानिक विद्यार्थी हे काही ट्रेडमध्ये टाटा पॉवरने प्रायोजित करण्यात आलेले होते व त्यांचे प्रशिक्षण पूर्ण केलेले होते. त्याशिवाय टाटा पॉवरची स्वतःची स्कील डेव्लपमेंट इन्स्टिटयुट-कौशल्य विकास संस्था असून त्याच्या विविध ठिकाणी शाखा आहेत. त्यांच्या माध्यमातून स्थानिक तरुण-तरुणींना प्रशिक्षण देऊन रोजगारक्षम करण्यात येईल. याबाबत स्थानिकांशी चर्चा करुनच धोरण, नियोजन व अंमलबजावणी करण्यात येईल.

श्री खांडभोर यांनी येथे सूचना केली की बैठकीत चर्चा केल्याप्रमाणे लोणावळ्याऐवजी येथेच बैठक आयोजित करण्यात यावी. स्थानिकांना विश्वासात घेण्यात यावे. त्यांच्या सूचनांनुसार सीएसआर निधी वाटप करण्यात यावे. काही शेतक-यांकडे जमिनी आहेत. पण त्याच्याकडे ७/१२ नाही. त्यामुळे त्यांना जलसंपदा विभागाकडून पाणी परवाना मिळणार नाही. या परिसरात फक्त १०% शेतकरी असतील की ज्यांच्याकडे पाणी परवाना आहे. तसेच असेही स्थानिक शेतकरी आहेत की त्यांना जमीन नाही, ती कंपनीकडे आहे. तरी त्यांना शेती करण्यास संमती द्यावी, त्यात आडकाठी करु नये.

श्री सांडभोर यांनी सीएसआर बाबत उत्तर देण्याची सूचना केली. तसेच पाण्याच्या रॉयल्टीबाबत उत्तर दिलेले नाही. ते देण्यात यावे. प्रशिक्षणाबाबत काही धोरण तयार करता येईल. येथे चांगल्या प्रकारे प्रकल्प झालाच पाहिजे. येथील युवक-युवतींना रोजगार मिळावा असे सर्व स्थानिकांना वाटते. तरी स्थानिकांना विश्वासात घेण्यात यावे.

श्री खांडभोर यांनी माहिती दिली की प्रकल्पाच्या खालील भागात काही व्यक्ती/तोतये हे आपल्या कंपनीत नोकरी लाऊन देण्याची हमी देऊन सामान्य, गरजू कुटुंबांकडून पैसे उकळत आहेत. संबंधित व्यक्तींविरुध्द पूर्वीच गुन्हे दाखल झालेले असून सदरहू व्यक्ती/तोतयांविरुध्द प्रकल्प प्रशासन फौजदारी गुन्हा नोंदविणार आहात काय? कारण यामुळे टाटा ग्रुपचे नांव खराब होत आहे. याबाबतीत कंपनी व्यवस्थापनाने अशा अपप्रवृत्तीविरुध्द त्वरित निर्णय घेणे आवश्यक आहे. तसेच उर्वरित मुद्द्यांवर उत्तर देण्यात यावे.

- प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की, कंपनी प्रशासनाच्या असे निदर्शनास आलेले आहे की कोणीतरी व्यक्ती/तोतये स्थानिकांना टाटा पॉवरमध्ये नोकरी, कंत्राटे देण्याचे आश्वासन देऊन गरजू लोकांकडून पैसे उकळत आहेत. तरी सर्व स्थानिक जनतेस विनंती करण्यात येत आहे की कोणाच्याही भूलथापांना भूलू नका, बळी पडू नका. कंपनी कधिही पैसे घेऊन माणसे लावत नाही. सदरहू बाब ही कंपनीच्या वरिष्ठ प्रशासनास त्वरित कळविण्यात येईल व त्याबाबत कंपनीचे वरिष्ठ प्रशासन त्वरित निर्णय घेईल.
- प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, पाण्याच्या रॉयल्टीबाबत प्रश्न विचारण्यात आला. तर टाटा पॉवरला रॉयल्टी लागू होत नाही. कारण वीजनिर्मितीसाठी पाणी वापरण्यात येते आणि ते वापरलेले पाणी (Used Water) परत सोडण्यात येते. प्रकल्पात पाण्याचा वापर हा Non-consumptive वापर आहे. त्यामुळे प्रकल्पास पाण्याची रॉयल्टी लागू होत नाही. त्यामुळे पाण्याची रॉयल्टी ही ग्रामपंचायत, जिल्हा प्रशासन, महाराष्ट्र शासन यांना देण्यात

प्रश्न उद्भवत नाही. प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की आम्ही ग्रामपंचायत कर हा वेळोवेळी भरत असतो.

- प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की सीएसआर निधीच्या खर्चाबाबत एकत्रित बैठक लवकरच आयोजित करण्यात येऊन स्थानिकांच्या गरजा लक्षात घेऊन सकारात्मक निर्णय घेण्यात येईल.

४) **श्री शोभीनाथ पांडूरंग भोईर, राहणार- सावळागाव, तालुका-मावळ, जिल्हा-पुणेः-**

आमच्या ग्रामपंचायतीच्या हद्दीत एक नविन प्रकल्प येत आहे. त्यासाठी ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही आयोजित करण्यात आलेली आहे. गेले अनेक वर्षे आम्ही टाटाच्या विरुध्द संघर्ष करत आहोत. जेव्हा कंपनी प्रशासनास काम करायचे असेल, त्यावेळी खोटी आश्वासने देण्यात येतात. आमचा येथील शेतकरी ही भोळाभाबडा धरणग्रस्त आहे. आमच्या पूर्वजांनी या टाटाला किंवा शासनास जमिनी दिल्या. त्यावेळी करारनाम्यात काय ठरले हे सांगता येणार नाही. मात्र माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याला बोलण्यास व्यासपीठ उपलब्ध झाले, म्हणून बोलत आहे. आमच्या पूर्वजांकडून ज्या जमिनी अधिग्रहित करण्यात आल्या, त्या कशा घेतल्या? शासनामार्फत घेतल्या वा जमिन प्रत्यक्ष संबधित व्यक्तीकडून घेण्यात आल्या? याची सर्व माहिती, पुरावा संबंधित क्षेत्रातील ग्रामपंचायतीस उपलब्ध करुन देण्यात यावा. प्रकल्प प्रवर्तकांकडे, शासनाकडे वा अन्य स्त्रोतांकडे या जमिनीच्या कराराबाबत जी माहिती आहे, ती संबंधित ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात यावी.

पुढील मुद्दा कान्हा फाटा ते सावळा गाव यातील रस्ता अंतर (road distance) हे चाळीस किलोमीटर आहे. येथे एवढी मोठी टाटा कंपनी असताना, आमच्या गावात मोठा दवाखाना नाही, शिक्षणाची सोय नाही. येण्याजाण्याची सोय नाही. गावाचा विकास नाही.

तरी माझी मागणी अशी आहे की टाटा कंपनीने भिवपूर ते टाटा रोड, पुर्वी आमचे वाडवडिल हे पायवाटेने जायचे. हा रस्ता आम्ही पायवाटेने जायचो, आम्हीसुध्दा काही वेळा जातो, कारण आम्हांला कर्जत तालुका हा जवळ आहे. रेल्वेने कर्जतला जाताना लोणावळ्याहून जावे लागते. रेल्वेला वेळ लागतो, तर येथून कर्जतला पायी एक तासात जातो. पूर्वी कंपनीचे लोक स्थानिकांना, गरजूंना, धरणग्रस्तांना, शेतक-यांना लिफ्टमध्ये घेत असत. मात्र तेथे काही अडचणी निर्माण झाल्यामुळे ते बंद करण्यात आलेले आहे. कंपनी त्यांच्यासाठीच लिफ्ट वापरते, स्थानिकांना घेण्यात येत नाही.

तरी माझी मागणी आहे की जर कंपनीने टाटा रोड ते भिवपुरी रस्ता हा जोडरस्ता विकसित केला, तर स्थानिकांना त्यांच्या प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष व्यवसायात फायदा होईल.

पुढील मुद्दा वीज उपलब्धतेविषयी आहे. कंपनी असे म्हणते की ज्या जमिनी घेतल्या, त्या शासनाच्या मार्फत घेतल्या, त्यामुळे धरणग्रस्तांना वीज देता येणार नाही. तर त्यासाठी मागणी आहे की कंपनीने शासनामार्फत आम्हांला वीज उपलब्ध करुन द्यावी. येथे महिनोमहिने वीज नसते. जर शासन आणि टाटा हे संयुक्त/connect आहेत, तर येथील धरणग्रस्तांना, स्थानिकांना वीज का उपलब्ध करण्यात येत नाही?

तरी आमची मागणी आहे की आमच्या धरणग्रस्त व स्थानिकांना त्यांच्या घरगुती वापरासाठी आणि त्यांच्या शेतीवापरासाठी कंपनीने वीज ही मोफत उपलब्ध करुन देण्यात यावी.

पुढील सूचना देण्यात येते की ज्यावेळी स्थानिक, धरणग्रस्त व्यक्ती ही टाटाच्या हद्दीत काही गरज असताना जातात, त्यावेळी तेथील सुरक्षा रक्षकांकडून त्यांना अपमानास्पद आणि गुलामगिरीची वागणूक दिली जाते. त्यावर ताबडतोब पुढील कार्यवाही होणे गरजेचे आहे.

तसेच काही आपत्तीजनक परिस्थितीत स्थानिक व्यक्तीस मदत लागल्यास कान्हा फाट्यास जाण्यास वेळ लागतो, त्यावेळी संबंधित व्यक्तीस, वृध्द, रोगी व्यक्तीस टाटाच्या लिफ्टमधून नेण्यास परवानगी देण्यात यावी.

पुढील मुद्दा कामगारांचा. सादरीकरणात सांगण्यात आलेले आहे की प्रकल्पात स्थानिकांना रोजगाराची संधि देण्यात येईल. तर येथील धरणग्रस्त/प्रकल्पग्रस्त खांड, सावळा गावातील आणि संलग्न ग्रामपंचायत हद्दीतील युवक-युवतींना प्रकल्पात रोजगाराची संधि देण्यात यावी. व्यवस्थापनाने कोणाच्या दबावाला बळू न पडता स्थानिकांना प्रकल्पात रोजगाराची संधि द्यावी.

तसेच बैठकीत उपस्थितांनी, स्थानिकांनी ज्या मागण्या केल्या, त्या पूर्तता करण्याची लेखी हमी देईपर्यंत आम्ही प्रकल्पास विरोध करणार आहोत.

पुढील सूचना आहे की किवळे ते सावळा आणि वडेश्वर ते खांड येथील जमिनी प्रकल्पासाठी अधिग्रहित केल्याने काही शेतकरी हे भूमीहिन झालेले आहेत. त्यांचे सर्वेक्षण करणे आवश्यक आहे. जर तो पूर्णपणे भूमीहिन झाला असेल, तर त्याच्या मुलाला किंवा मुलीला प्रकल्पात नोकरी देणे अत्यंत आवश्यक आहे.

वर्तमानकाळात/सद्यस्थितीत तळ्यात जे पाणी असते, त्याची कंपनीने हद्द मार्क केलेली आहे. मात्र ते पाणी अनेक शेतक-यांच्या शेतात जाते. जर त्या शेतक-याची एक एकर जागा प्रकल्पाच्या पाण्यात जात असेल, तर तेवढीच जागा म्हणजे एक एकर जागा कंपनीने पर्यायी ठिकाणी द्यावी. ही आमची मागणी आहे.

- प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर देताना सांगितले की, श्री भोईर यांनी मागितलेली सर्व माहिती ही उपलब्ध करुन देण्यात येईल. या परिसरात भूसंपादन हे १८९४ मध्ये झाले. सर्व प्रक्रिया ही कायद्याप्रमाणे पाळण्यात आली. याची तपशीलवार माहिती उपलब्ध आहे. शासनाच्या संबंधित विभागातही ती माहिती असून ती ज्यांना हवी त्यांना मिळू शकेल. वेळोवेळी ती माहिती आम्ही उपलब्ध केलेली असून ती परत उपलब्ध करुन देण्यात येईल.
- प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, श्री भोईर यांनी हॉईस्टचा वापर धरणग्रस्त, वृध्द आणि शेतकरी यांना करुन देण्याची मागणी केली. पूर्वी आम्ही करुन देत होतो. मात्र सुरक्षिततेच्या मुद्यावर ती बंद करण्यात आली. तो परिसर हा कारखान्याच्या हद्दीत येतो आणि एखादा अपघात किंवा इतर प्रसंग झाल्यास त्यास विनाकारण व्यवस्थापनास त्रास होण्याची शक्यता आहे.

- वीजपुरवठ्या बाबत सूचना करण्यात आलेली आहे. प्रकल्प व्यवस्थापनाने वीज वितरण परवाना प्राप्तीसाठी बरेच प्रयत्न केलेले आहेत. आम्हांला वीज वितरणाचा परवाना अजून अदा करण्यात आलेला नाही. मात्र या क्षेत्रात महाराष्ट्र उर्जा आयोगाच्या सूनचेनुसार महाराष्ट्र राज्य वितरण कंपनी आहे. जर शासनाकडून परवानगी मिळाल्यास आम्हांला आनंद होईल व वीज उपलब्ध करता येऊ शकेल.
- स्थानिक व धरणग्रस्तांना सुरक्षारक्षकांकडून अपमानास्पद वागणूक मिळते हा आक्षेप नोंदविण्यात आलेला आहे. तसा प्रसंग झाला असल्यास टाटा पॉवरतर्फे दिलगिरी व्यक्त करण्यात येत आहे. तसेच अवधानाने सुरक्षा रक्षकांकडून तसे झाले असल्यास त्यांना आपण माफ करावे. संबंधितांना याबाबत परत सूचना देण्यात येतील.
- पुढील मुद्दा - स्थानिकांना रोजगाराची संधी. याबाबत प्रकल्प व्यवस्थापनाने वेळोवेळी सांगितले आहे की प्रकल्पात जास्तीतजास्त स्थानिकांनाच रोजगाराची संधि देण्यात येत व येईल.
- पुढील मुद्दा - धरणातील पाण्याची पातळी वाढल्यानंतर कंपनीने अधिग्रहित केलेल्या जमिनीच्या बाहेर, कंपनीच्या हद्दीच्या बाहेरील शेतात पाणी जाते. त्यामुळे त्याच्या शेताचे नुकसान होते. तर अशी बाब प्रकल्प प्रवर्तकांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी. त्याबाबतीत निश्चितच तोडगा काढण्यात येईल.
- येथे आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की, सदरहू जनसुनावणी ही प्रस्तावित प्रकल्पाच्या प्रयावरणविषयक सूचना, आक्षेप नोदविण्यासाठी आहे. येथे ब-याच लोकांनी स्थानिक प्रश्न उपस्थित केलेले असून प्रकल्प प्रवर्तकांनी त्यांचे स्थानिक प्रश्न सोडविण्याचे व सकारात्मक तोडगा काढण्याचे आश्वासन दिलेले आहे. तरी उपस्थितांना आवाहन करण्यात येते की प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप हे उपस्थित करण्यात यावेत.

**५) श्री प्रकाश भाऊ देशमुख, माजी सरपंच, खांड, तालुका-मावळ,जिल्हा-पुणेः-**

माझा प्रश्न आहे की पूर्वी आमच्या गावाताली लोक हे टाटा रस्त्याने - पाईपलाईन शेजारी रस्त्याने जात होती. कालांतराने तो रस्ता कंपनीने बंद केला. तो रस्ता कंपनीने सर्वांसाठी खुला केला. कारण या रस्त्याने सर्व लोक भिवपुरी-कर्जतला अर्धा तासात जातात.

दुसरा प्रश्न - चाळीस वर्षापूर्वी कंपनीने आश्वासन दिलेले होते की येथील शेतक-यांना पाण्यासाठी लिफ्ट देऊ, शेतीला पाणी देऊ. आता तुम्ही पाणी परत घेणार आहेत. तुमचे धरण भरणार आहे. तर शेतक-याकडे थोडीफार जमिन राहिली असेल तर त्याला लिफ्टने पाणी दिले तर तो सधन होईल. त्यावर तो उपजिविका करु शकतो .

तिसरा प्रश्न खांड, सावळा या येथील संपूर्ण क्षेत्रातील कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीस प्रकल्पात रोजगाराचा संधी देण्यात यावी. आपला प्रकल्प हा ४ - ५ वर्षात पूर्ण होईल. येथील शेतकरी ही देशोधडीला लागणार आहे. तरी उपजिविकेसाठी त्याला प्रकल्पात सामील करुन घ्यावे.

- प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर देताना सांगितले की या प्रश्नाचे उत्तर देण्यात आलेले आहे. पाईपचा रस्ता हा कारखान्याच्या हद्दीत येत असल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीने तो प्रकल्प

प्रवर्तकांना बंद ठेवावा लागला. तेथे अपघात, अनुचित घटना घडल्यास त्यास कंपनीची जबाबदारी राहते.

त्यावेळी श्री **भोईर आणि इतरांनी एकत्रित मागणी केली** की आपण रस्ता बंद केला. तर आम्हांला पर्यायी रस्ता तयार करुन द्यावा. दुसरे काही नको. त्यांनी एकत्रित मागणी केली. की खांड सावळा रस्ता अरुंद असून त्याबाबत उपाययोजना करण्यात याव्यात.

६) **श्री राजेश खांडभोर, राहणार- वडेश्वर गाव, तालुका-मावळ, जिल्हा-पुणेः-**

यांनी सूचना केली की रस्त्याबाबत ठोकरवाडी किंवा वडेश्वर येथे सर्व ग्रामपंचायतीची बैठक /सुनावणी ही आयोजित करण्यात यावी. तेथे टाटा रस्त्याबाबत तोडगा काढण्यात यावा. पुढे विचारणा केली की किती मीटरची ब्लास्टींग होणार आहे? ३५ मीटरचा बोगदा आहे. तेथील घरे, लोकवस्ती यावर ब्लास्टींगचा काही परिणाम होणार आहे काय? तसेच ब्लास्टीग व बांधकाम करताना जी धूळ उडणार आहे, तर ती किती वेळ ब्लास्टींगनंतर उडेल. दिवसातून किती वेळा ब्लास्टींग करणार आहेत, सूर्योदय ते सूर्यास्त करणार वा कसे करणार? येथे प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी आहेत, तर आपणच सांगावे की ब्लास्टींगमुळे पर्यावरणास काही हानी पोचणार आहे का? याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे.

७) **श्री अंकूश आंबेकर, राहणार- खांड निळशी गाव, तालुका-मावळ, जिल्हा-पुणे**

यांनी येथे प्रश्न विचारला की ब्लास्टींग झाल्यानंतर जे मटेरियल निघेल, तर वाहतुक कशी होईल? कारण खांड येथील रस्ता अरुंद आहे. खांड, सावळी येथून जाणारे रस्ते अत्यंत अरुंद आहेत. तर तेथील वाहतुकीबाबत काय उपाययोजना प्रकल्प प्रवर्तकांनी प्रस्तावित केलेल्या आहेत?

- प्रकल्प प्रवर्तकांनी प्रथम ब्लास्टींग बाबत उत्तर देताना सांगितले की येथे बहुतेक सर्व ब्लास्टींग हे जमीनीखाली होणार आहे. प्रकल्पातील दोन कि.मी. लांबाची बोगदा आहे, तो जमिनीपासून ३५ मीटर खाली आहे. जास्तीतजास्त ब्लास्टींग हे भूमीगत होणार आहे. त्यामुळे ब्लास्टींगमुळे हवेत धुळीकण उडण्याचा प्रश्नच येत नाही. तसेच सादरीकरणात सांगितल्याप्रमामे येते कंट्रोल्ड ब्लास्टींग करण्यात येणार आहे. त्याचे कारण ध्वनी प्रदूषण, कंपने यामुळे आजूबाजूच्या घरांना यामुळे हानी पोचू नये. पारित मर्यादेच्या आत राहूनच भूमीगत कंट्रोल्ड ब्लास्टींग करण्यात येईल. त्यामुळे आजूबाजूच्या घरांना धोका पोचणार नाही.
- प्रकल्प प्रवर्तक यांनी पुढे सांगितले की रस्ता अरुंद असल्याने जड वाहतूक करणेबाबतचे नियोजन हा प्रश्न विचारण्यात आलेला होता. त्यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तकांनीसुध्दा अरुंद रस्त्याबाबत सर्वेक्षण केलेले आहे. रस्त्याचे काम चालू होईल आणि मलबा जो निघेल, अरुंद रस्त्यावरुन जड वाहनांची वाहतुक होईल, याबाबत कंपनीने सर्वेक्षण केलेले असून त्याचा प्रारुप अहवाल कंपनीस प्राप्त झालेला आहे. त्यांनी सांगितलेल्या उपाययोजना अंमलात आणल्यानंतरच प्रकल्पाच्या बांधकामाची सुरवात करण्यात येईल. प्रकल्पासाठी येणा-या अवजड वाहनांबरोबरच स्थानीक वाहनांसुध्दा अडथळा न येण्याचा आमचा मानस आहे.

८) **श्री राजेश खांडभोर, राहणार- वडेश्वर गाव, तालुका-मावळ, जिल्हा -पुणेः-**

यांनी पुढे विचारणा केली की बैठकीत आश्वासन दिल्याप्रमाणे आपण सर्व ग्रामपंचायतीची बैठक केव्हा आयोजित करणार आहात ते सांगावे, म्हणजे सर्व ग्रामपंचायतींचे ठराव करुन त्यांचे प्रश्न कंपनी प्रशासनास सादर करण्यात येतील. प्रत्येक ग्रामपंचायतीस आपण एक तास दिला, तरीही सर्व विषय संपविता येतील. याबाबत स्पष्टीकरण.

- प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की भिवपुरीला १२ एप्रिल, २०२४ रोजी एक पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आहे. ती झाल्यानंतर येथेच खांड गावातच बैठक बोलाविण्यात येईल. संपूर्ण एक दिवस बैठक आयोजित करुन त्यावर मार्ग काढण्यात येईल.

९) **श्री सागर विठ्ठल नगरकर, राहणार -खांड गाव, तालुका-मावळ, जिल्हा-पुणे**

यांनी पुढे प्रश्न विचारला की भिवपुरीला धरण बांधणार असल्याने झाडांची कत्तल होणार आहे. ती किती होईल? त्याबदल्यात झाडांची लागवड करताना प्रमाण कसे असेल? म्हणजे १:५, १:१०.

पुढची मागणी -प्रकल्पात नियंत्रित ब्लास्टींग होणार आहे. तर जो मलबा निघेल, तो आमच्या क्षेत्रात जमा करू नये.

पुढील प्रश्न - प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर परिसरात मनुष्यबळात वाढ होईल. त्यामुळे उत्पन्न होणा-या घरगुती कच-यात वाढ होणार आहे. त्यावर काय उपाय योजना करण्यात येतील?

- प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की, प्रकल्प स्थानावर जी झाडे आहेत, ती कापावी लागतील. तर वनविभागाने पारित केलेले सर्व निर्देश पाळण्यात येतील. तसेच झाडे तोडल्यामुळे Compensatory Afforestation करणे असल्यास भूखंड उपलब्धता, वृक्ष लागवडीचा खर्च व देखभाल याबाबत वनविभागाचे सर्व निर्देश पाळण्यात येतील. कार्यरत प्रकल्पात हरित पट्टा विकसनासाठी भरपूर झाडे लावलेली आहेत. नविन प्रकल्पाचा भाग म्हणून वन विभागाचे सर्व निर्देश पाळण्यात येतील व त्याची माहिती उपलब्ध करण्यात येतील.
- प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की, मलबा साठवण व विल्हेवाट याबाबत नियम आहेत, जेणेकरुन जलप्रदूषण न होणे. ते सर्व नियम, निर्देशांचे प्रकल्प प्रवर्तक पालन करणार आहे.
- प्रकल्पामुळे मनुष्यबळात वाढ झाल्याने परिसरातील घरगुती कच-यात वाढ होईल. कामगार वसाहतीत घरगुती सांडपाणी तसेच इतर कच-यात वाढ होईल. तर त्याबाबत शासन, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी पारित केलेले निर्देश तंतोतंत पाळण्यात येतील. घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येईल. परिसरातील पर्यावरणाच कमीतकमी आघात होण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत.

१०) **श्री गणेश लोहे, राहणार-अंभू गाव,तालुका-खेड, जिल्हा-पुणेः-**

खेड तालुक्यातील अढे, अंभू, वंजूळ विहिरे, वांद्रे, तोरणे खुर्द या गावांना या प्रकल्पाचा काय फायदा होणार आहे याबाबत सविस्तर माहिती सांगण्यात यावी.

- प्रकल्प प्रवर्तक यांनी स्पष्टीकरण देताना सांगितले की बैठकीत चर्चा करताना श्री खांडभोर यांनी जी सूचना केली ती स्वागतार्ह आहे. त्याप्रमाणे सर्व प्रकल्पबाधित गावांची बैठक बोलविण्यात येईल. गावातील गरजांनुसार सीएसआर निधी खर्च करण्यात येईल. आपण एकत्र बसून त्याबाबत पुढील दिशा ठरविता येईल.

**११) श्री शोभीनाथ पांडूरंग भोईर, राहणार- सावळागाव, तालुका-मावळ, जिल्हा-पुणे**

यांनी भिवपुरी ते टाटा रोडच्या वापराबाबत उत्तर न दिल्याने ते उत्तर देण्याची मागणी केली. त्यांनी मत मांडले की जर रस्ता विकसित केला, तर आमचे कुठलेच प्रश्न राहणार नाहीत. आमच्या जमिनी गेलेल्या आहेत. भिवपुरी ते टाटा रस्ता विकसित करणार वा नाही याचे उत्तर देण्यात यावे

- प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की, याबाबत येथे लगेच उत्तर देणे शक्य नाही.

त्यावेळी श्री भोईर यांनी मागणी केली की जोपर्यंत रस्ता बांधण्याबाबत निर्णय होत नाही, तोपर्यंत आपण आपला प्रकल्प चालू करु नये अशी आपणास विनंती. श्री भोईर यांनी सांगितले की आमचा विकास म्हणजे कर्जत तालुका मावळ तालुका. आमची एकच मागणी आहे की भिवपुरी ते टाटा रस्ता हा तयार करणे. तो एकेरी असला तरी चालेल, पण तो रस्ता होणे सर्वात जास्त गरजेचे आहे.

**१२) श्री बाळासाहेब घाडगे, राहणार-माळेगाव ग्रामपंचायतः-**

ही पर्यावरणविषयक जनसुनावणीत प्रस्तावित प्रकल्प उभा राहणार याबद्दल आनंद तर ब-याच स्थानिकांनी त्यांच्या व्यथा मांडलेल्या आहेत. प्रस्तावित प्रकल्पाविषयी ही जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे, तर पवनचक्क्या उभारणी करताना अशी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी का आयोजित करण्यात आलेली नाही?

- आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दिनांक १४ सप्टेबर २००६ नुसार काही विशिष्ट प्रकल्पांना प्रकल्प कार्यान्वित होण्यापूर्वी पर्यावरण अनुमती घेणे बंधनकारक आहे. त्यासाठी आगाऊ पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करणे बंधनकारक आहे. त्या यादीत पवनचक्क्या प्रकल्पाचा समावेश नाही.

त्यांनी आक्षेप नोंदविला शंभर वर्षांपूर्वी आमच्या जमिनी गेल्या. त्याकाळात ते अशिक्षित होते. तर आता येथील आमची मुले पदवीधर, आय.टी.आय झालेले आहेत. प्रकल्पात त्यांना प्राधान्य देण्यात यावे. तसेच येथील बरेच स्थानिकांकडे बाधकाम साहित्य, ट्रॅक्टर, जेसीबी आहेत. तर बाहेरील व्यक्तींचे बांधकाम साहित्य, , ट्रॅक्टर, जेसीबी वापरण्यापेक्षा स्थानिक लोकांकडील बांधकाम साहित्य वापरण्यात यावे. स्थानिकांना काम देण्यात येत नाही, ते पुढे कर्ज फेडू शकत नाही.

शासकीय प्रशासनाला विनंती आहे की जर येथून स्थानिक, धरणग्रस्त, शेतकरी हे कर्जतला १५-२० मिनिटात जात असतील, तर असे प्रकल्प हाती घ्यावेत. वडेश्वरला हॉस्पिटल होणार आहे. तसेच येथील मुलांना कॉलेजसाठी पुण्याला जावे लागते. तर येथे कॉलेज होणे गरजेचे आहे. टाटाच्या वतीने या परिसरात कॉलेज होणे गरजेचे आहे. त्यांनी जिल्हा प्रशासनास याबाबत लक्ष घालण्याचे आवाहन केले. आमच्याकडे कित्येकदिवस वीज नसते, पण पंधराशे-दोन हजार बील येते. तरी स्थानिक मुले शिकलेली, कौशल्यधारित आहेत, त्यांना प्रकल्पात रोजगाराची संधि देण्यात यावी.

- प्रकल्प प्रवर्तक यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना सांगितले की यातील बरेच प्रश्नांची उत्तरे ही पूर्वीच देण्यात आलेली होती, आपण मांडलेल्या सूचनांबाबत सकारात्मक विचार करण्यात येईल.
- आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले बरेच स्थानीक प्रश्न विचारण्यात आलेले असून शासन म्हणून त्यांची नोंद घेण्यात आलेली आहे. टाटा कंपनीनेसुध्दा सहकार्य करण्याचे कबूल केलेले आहे.

१३) <u>श्री सुभाषराव देशमुख, ग्रामपंचायत सदस्य, राहणार-खांड, तालुका-मावळ,जिल्हा-पुणे,</u>

मी येथील स्थानिक असल्याने मला येथील स्थानीक प्रश्नांची चांगली माहिती आहे. प्रकल्पाचे स्वागत आहे. स्थानिकांना रोजगाराची संधि उपलब्ध होणार आहे. या प्रकल्पास लोकांचा विरोध नाही. प्रकल्पाने सर्व पर्यावरण नियम पाळणार असल्याचे सादरीकरणात दर्शविलेले आहे. तसेच टाटा ग्रुप हा दानशूर ग्रुप आहे. प्रत्येक वेळी ते सहकार्य करण्यात नेहमीच पुढे असतात.

तसेच कंपनीने एक एक दिवस प्रत्येक ग्रामपंचायतीस देण्यात यावा, जेणेकरुन ग्रामसभेत ठराव मंजूर करुन सामाजिक योजनांबाबत माहिती ते कंपनीस सादर करतील. कंपनीने समन्वयाने पुढील कार्यवाही करावी.

- अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी आवाहन केले की येथे महिला उपस्थित असून त्यांनी पर्यावरणविषयक प्रश्न उपस्थित करण्याचे आवाहन करण्यात येते. त्यानंतरही कोणालाही सूचना, हरकती नोंदवावयाच्या असल्यास त्या लेखी स्वरुपात सादर करण्यात याव्यात.

१४) <u>माधवी औरिया, राहणार-खांड गाव, तालुका - मावळ, जिल्हा-पुणेः-</u>

प्रदूषणाबाबत प्रश्न विचारत आहे. प्रकल्पामुळे जड वाहनांची वाहतुक वाढली तर येथे रस्ते अरुंद आहेत. येथे बाईक्स, टू व्हिलर वापरण्यात येतात. खांड गावातील एक ग्रामस्थांचा मोठा अपघात झाला. कारण त्यांची स्कूटर ही जड वाहनांना धडकली. जर भिवपुरी-कर्जत ते टाटा रस्ता तयार करण्यात आला, तर त्यामुळे प्रदूषण कमी होईल. अंतर कमी झाल्याने पेट्रोल, डिझेलचा वापर कमी होईल. त्याचप्रमाणे कान्हे फाट्याला जाणा-या लोकांना रस्ता वाहतुकीसाठी मिळेल. ही माझी सूचना आहे.

- प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की अरुंद रस्ते व कंपनीमुळे वाढणारी जड वाहनांची वाहतुक याबाबत आम्ही सर्वेक्षण केलेले असून त्याची अंमलबजावणी करण्यात येईल. आमची कंपनी सर्वांची सुरक्षितता घेण्याची नेहमीत काळजी घेते.
- आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप नोदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

बैठकीचा समारोप करताना आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीच्या सुरवातीस सांगितलेले आहे की ही जनसुनावणी आपले विचार, सूचना, टीकाटिप्पणी यांची नोंद घेण्यासाठीच आयोजित करण्यात आलेली असून येथे कोणताही निर्णय घेण्यात येत नाही. उपस्थितांनी बरेच स्थानिक मुद्दे उपस्थित केले व त्यास प्रकल्प प्रवर्तक यांनी योग्य प्रकारे उत्तरे देऊन सकारात्मक धोरण स्विकारण्याचे आश्वासन दिलेले आहे. त्याचप्रमाणे काही उपस्थितानी पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप योग्य प्रकारे नोंदविलेले आहेत.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा इतिवृतात समावेश करण्यात येईल. सदरहू इतिवृत मराठी व इंग्रजीत तयार करुन ते सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, प्राप्त झालेल्या लेखी सूचना, आक्षेप, प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करण्यात येईल. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेईल.

आयोजक अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, यांनी मा. अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रतिनीधी, सदस्य, तहसीलदार मावळ, नायब तहसीलदार, जिल्हाधिकारी कार्यालय, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी, पोलिस प्रशासन व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे आभार मानून मा. अध्यक्षा यांच्या वतीने जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्षा यांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

सोबत प्राप्त झालेल्या ०४ लेखी सूचना/आक्षेप सोबत जोडत आहोत.

( विद्यासागर किल्लेदार)
संयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,पुणे-२
महाराष्ट्र प्रदूषण
नियंत्रण मंडळ,
पुणे

(प्रशांत गायकवाड)
प्रतिनिधी,
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण
नियंत्रण मंडळ,
पुणे

(ज्योती कदम)
अध्यक्षा,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, पुणे
जिल्हा - पुणे.